आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३० जून २०२५ - सोमवार

**ठळक बातम्या**

- लांब पल्ल्याच्या गाड्यांसाठीची रेल्वेची भाडेवाढ उद्यापासून लागू होणार

- राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात, पहिल्या दिवशी ५७ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर

- तेलंगणात कारखान्यात झालेल्या स्फोटात १२ जणांचा मृत्यू, २६ जण जखमी

**आणि**

- विम्बल्डन स्पर्धेला आजपासून लंडनमध्ये सुरुवात

**<><><><><>**

रेल्वेच्या प्रवासी भाड्यात उद्यापासून वाढ करायचा निर्णय रेल्वे मंत्रालयानं घेतला आहे. लांब पल्ल्याच्या गाड्यांचं तिकिट थोडं महाग होणार असलं, तरी लोकलचा प्रवास मात्र महागणार नाही.

पॅसेंजर गाड्यांच्या विनावातानुकूलित सामान्य श्रेणीसाठी ५०० किलोमीटर अंतरापर्यंत कोणतीही भाडेवाढ लागू होणार नाही. ५०१ ते १ हजार ५०० किलोमीटर अंतरासाठी पाच रुपये, त्यापुढे अडीच हजार किलोमीटर अंतरापर्यंत १० रुपये, त्यापुढे तीन हजार किलोमीटर अंतरासाठी १५ रुपये भाडेवाढ उद्यापासून लागू होणार आहे. तर शयनयान श्रेणी आणि पहिल्या वर्गासाठी अर्धा पैसा प्रति किलोमीटर या दरानं भाडेवाढ होईल.

मेल आणि एक्सप्रेस विनावातानुकूलित गाड्यांसाठी पहिल्या, दुसऱ्या आणि शयनयान श्रेणीसाठी प्रति किलोमीटर एक पैसा दरवाढ केली आहे. तर एसी श्रेणीसाठी २ पैसे प्रति किलोमीटर इतकी दरवाढ उद्यापासून लागू होईल. उपनगरी रेल्वे प्रवासाच्या, तसंच उपनगरी आणि सामान्य मार्गांवरच्या हंगामी तिकिटांच्या

दरात कोणतेही बदल केलेले नाहीत. याव्यतिरिक्त इतर कोणत्याही शुल्कात बदल होणार नाहीत.

**<><><><><>**

एसटीच्या लांब आणि मध्यम पल्ल्याच्या प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना उद्यापासून तिकीट दरात १५ टक्के सवलत मिळणार आहे. प्रवाशांना प्रत्यक्ष तिकीट खिडकीवर, एसटीच्या अधिकृत संकेतस्थळावर, तसंच ॲपवर आगाऊ आरक्षण करता येईल. दिवाळी आणि उन्हाळी सुट्ट्यांचा गर्दीचा काळ सोडता वर्षभर ही योजना सुरू राहील. मात्र, फक्त पूर्ण तिकीट काढणाऱ्या, कोणत्याही सवलतीचा लाभ न घेणाऱ्या प्रवाशांनाच या योजनेचा फायदा घेता येईल. तसंच जादा गाड्यांसाठी ही सवलत लागू नसेल.

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला आजपासून मुंबईत सुरुवात झाली. आजच्या पहिल्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाला मंत्री छगन भुजबळ यांचा परिचय करून दिला. त्यानंतर विविध अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याची घोषणा विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली.

यानंतर, विधानसभेत माजी आमदार रोहिदास देशमुख, विख्यात खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते लहानू कोम आणि समाजसेविका डॉ. श्रद्धा टापरे यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मांडला आणि सर्व सदस्यांनी दोन मिनिटं स्तब्ध राहून तो संमत केला. त्यानंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. विख्यात खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर, विधानपरिषदेचे माजी सदस्य अरुण जगताप आणि डॉ. रामदास आंबटकर यांच्या निधनाबद्दल

शोकप्रस्ताव विधानपरिषदेत सभापती राम शिंदे यांनी मांडला आणि सर्व सदस्यांनी दोन मिनिटं स्तब्ध राहून तो संमत केला. त्यानंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या विधीमंडळात सादर केल्या. हा निधी प्रामुख्याने रस्ते, मेट्रो, पायाभूत सुविधा प्रकल्प, सिंहस्थ कुंभमेळ्याचं नियोजन आणि अंमलबजावणी, महात्मा ज्योतिराव फुले आरोग्य योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, मागास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, दुर्बल आणि वंचित समाजघटकांच्या विकासाकरता उपयोगात आणला जाणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जयंत पाटील यांनी या पुरवणी मागण्यांवर प्रतिक्रिया दिली.

**- होल्ड बाईट - जयंत पाटील -**

**<><><><><>**

बिहारमधल्या ४ कोटी ९६ लाख मतदारांना सध्या सुरू असलेल्या विशेष मतदार यादी पुनरीक्षणात पुन्हा कागदपत्र देण्याची गरज नाही. या मतदारांच्या मुलांनाही पालकांची काही कागदपत्र द्यावी लागणार नाहीत. या सर्व मतदारांच्या नावांचा समावेश २००३ मधल्या मतदार यादीमध्ये होता. यामुळं सुमारे ६० टक्के मतदारांना सध्या सुरू असलेल्या मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रियेत पुन्हा कागदपत्रं द्यावी लागणार नाहीत. तीन महिन्यांवर निवडणुका आल्या असताना ही मोहीम सुरू केल्यामुळं विरोधकांनी निवडणूक आयोगावर टीका केली होती.

**<><><><><>**

अल्प बचत योजनांचे व्याजदर चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत सुद्धा जैसे थे राहणार आहे. PPF वर ७ पूर्णांक १ दशांश टक्के तर राष्ट्रीय बचत

प्रमाणपत्रावर ७ पूर्णांक ७ दशांश टक्के व्याज मिळेल. ज्येष्ठ नागरिक बचत योजना आणि सुकन्या समृद्धी योजनेतल्या गुंतवणूकदारांना ८ पूर्णांक २ दशांश टक्के व्याज मिळेल.

**<><><><><>**

तेलंगणात संगारेड्डी जिल्ह्यात कारखान्यातल्या भट्टीचा स्फोट होऊन झालेल्या अपघातात १२ जणांचा मृत्यू झाला आणि २६ जण गंभीर जखमी झाले. स्फोटामुळे आगीचा भडका उडून सिगाची केमिकल्स कंपनीच्या आवारात सर्वत्र पसरली. राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची पथकं मदतकार्य करत आहेत. तेलंगणाचे कामगारमंत्री विवेक वेंकटस्वामी यांनी घटनास्थळी भेट दिली. अपघातातल्या जखमींना चांगले उपचार मिळवून देण्याचे निर्देश मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. केंद्र सरकार मदतकार्यात सर्वतोपरी योगदान देईल असं केंद्रीय कोळसा उद्योग मंत्री जी. किशन रेड्डी यांनी सांगितलं. या दुर्घटनेबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. राष्ट्रपतींनी मृतांच्या कुटुंबियांप्रति सहवेदना व्यक्त केली असून जखमींना लौकर बरं वाटावं अशी प्रार्थना केली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी २ लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांचं अर्थसहाय्य जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

अमरनाथ यात्रा येत्या ३ जुलैपासून सुरू होत असून पहलगाम आणि बालटाल या दोन्ही मार्गांवर जाणाऱ्या यात्रेकरूंसाठी प्रशासनामार्फत ऑफलाइन टोकन वितरित करायला सुरूवात झाली आहे. ही ऑफलाइन नोंदणी वैष्णवी धाम, पंचायत भवन आणि महाजन सभा या केंद्रांवर उद्या होईल. ३ हजार ८८० मीटर उंचीच्या पवित्र गुहेच्या अमरनाथ मंदिराची ३८ दिवसांची यात्रा गुरूवारी अनंतनाग जिल्ह्यातल्या ४८ किलोमीटर लांबीच्या नुनवान-पहलगाम मार्गावरून आणि गंदरबल

जिल्ह्यातल्या १४ किलोमीटर जास्त उंचीच्या बालताल मार्गावरून सुरू होईल. ही यात्रा सुरळीत पार पडावी यासाठी आज जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गांवरील सुरक्षा व्यवस्थांचा आढावा घेण्यात आला.

**<><><><><>**

पाकिस्तानातल्या पंजाब प्रांतात पावसाशी संबंधित दुर्घटनांमध्ये ११ लहान मुलांसह १८ जण मृत्युमुखी पडले. यापैकी बहुतेकांचा मृत्यू मोडकळीला आलेल्या इमारती आणि छपरं कोसळून झाल्याची माहिती संबंधित यंत्रणांनी दिली आहे. अशा घटनांमध्ये गेल्या २४ तासांत ५७ जण जखमी झाले असून पावसामुळे २७ घरांचं नुकसान झालं आहे. या भागातल्या लाहोर, सियालकोट, फैजलाबाद आणि गुरजनवाला या शहरांमध्ये पूर येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली होती.

**<><><><><>**

टेनिसविश्वात मानाच्या विम्बल्डन स्पर्धेला आज लंडनमध्ये सुरुवात झाली. स्पर्धेच्या पुरुष एकेरीत गतविजेता कार्लोस अल्काराजचा सामना फॅबिओ फॉगनिनी याच्याविरुद्ध सुरू आहे. १२व्या क्रमांकावर असलेल्या अमेरिकेच्या फ्रान्सिस टियाफो यानं दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. तर ९व्या क्रमांकावर असलेल्या दानील मेदवेदेव याला बेंजामिन बाँझी यानं चार सेट्समध्ये नमवलं. तर २४ व्या क्रमांकावर असलेल्या स्टेफानोस त्सित्सिपास याला पाठीच्या दुखापतीमुळे पहिल्या फेरीतून माघार घ्यावी लागली. महिला एकेरीत अग्रमानांकित अरीना साबालेंका आणि युक्रेनची एलेना स्वितोलिना या दोघींनी दुसरी फेरी गाठली. तर जागतिक क्रमवारीत विसाव्या क्रमांकावर असलेल्या येलेना ऑस्टापेंको हिला ब्रिटनच्या सोनाय कार्टल हिच्याकडून पराभवाचा धक्का बसला. यंदा पुरुष दुहेरीच्या मैदानात रोहन बोपण्णा, युकी भांब्री, ऋत्विक बोल्लीपल्ली आणि एन. श्रीराम बालाजी हे भारताचे चार टेनिसपटू आहेत.

**//<><><><><>//**